# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २०/०४/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २०/०४/२००५ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. १६/०४/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १०) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ११) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| २) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |

**रजेचा अर्ज आलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मिलन गोविंद पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला सुरूवात करण्यात यावी. तत्पुर्वी आज मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये संत गाडगेबाबा स्वच्छता अभियाना अंतर्गत कल्याण महानगरपालिकेचे मा. महापौर, मा. उपमहापौर व त्यांचे पदाधिकारी आपल्या शहराला भेट द्यायला येत आहेत आणि ते आल्यावर संपूर्ण शहराची पाहणी करणार आहेत. जसे मागच्या वेळेला अमरावती महानगरपालिकेचे पदाधिकारी आले होते, आपण भिवंडी महानगरपालिकेत गेलो होतो, असे जे अभियाना अंतर्गत दौरे सुरू आहेत आणि त्याकरिता अधिकारी व पदाधिकारी येत आहेत त्यामुळे मी सदस्यांना नम्र निवेदन करतो की, आपण जर ही सभा लवकर आटोपली तर ह्याच सभागृहामध्ये त्यांचीही सभा आहे तर सभा लवकर संपविण्यासाठी मी सदस्यांना नम्र विनंती करतो.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, माझा असा प्रश्न आहे की, आपण संत गाडगेबाबा स्वच्छता अभियाना अंतर्गत आजचा जो त्यांचा दौरा आहे. परंतु, पल्स पोलिओच्या निमित्ताने संपूर्ण प्रभागाचे कामगार, आमच्या विभागातील ६७ कामगारांपैकी ४६ कामगार पल्स पोलिओ, १२ डंपरवर, २ आयुक्तांच्या बंगल्यावर एकूण ६० कामगार आणि ७ गटार सफाईकरिता असे. ४६ कामगार पल्स पोलिओकरिता गेले. त्यामुळे साफसफाईकरिता जागेवर एकही कामगार नाही. काल मी तीन वेळा फोन केला तेव्हा ठेक्याचे चार कामगार पाठवले आणि संपूर्ण प्रभागात चार कामगार काय काम करणार हे तुम्ही मला सांगा.

**मा. सभापती :-**

सदर विषयावर आपण पुढच्यावेळी चर्चा करू या.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, हे प्रत्येक वेळेचे आहे. ह्याच्या व्यतिरिक्त अंगणवाडी आणि बालवाडीच्या ज्या कर्मचारी आहेत त्यांना ही पल्स पोलिओची ड्युटी असते. जर आपण दोघांचा एखादा ग्रुप बनवला तर एक दिवसात एक गाव सहज करू शकतो. आठ-आठ दिवस कशासाठी लागतात? आणि जर एवढे ४६ कामगार एका प्रभागात लागतील तर सफाई कोणी करायची?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, पल्स पोलीओ मोहीमेकरिता आपण त्यांच्या घरोघरी आठ दिवस जातो त्यामुळे बुथवर कोणी येत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपण आता विषयपत्रिकेवरील विषय घेवू या आणि विषयपत्रिकेवरील विषयानंतर आपण ह्या विषयाची चर्चा करू या.

**केशव घरत :-**

साहेब, प्रत्येकवेळी पल्स पोलिओ मोहिम आल्यानंतर हे असेच होते ना!

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण डॉक्टर साहेबांना बोलवा आम्हाला त्यांच्याशी चर्चा करायची आहे.

**गजानन भोईर :-**

साहेब, सदर मोहिमे अंर्तगत आपल्याला टेम्परर‍री माणसे घेता येतात हवे असल्यास आपल्याला आम्ही माणसे पुरवतो.

**केशव घरत :-**

मुलांच्या आता परिक्षाही संपलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मुलांना इंजेक्शन थोडीच मारायचे आहे डोसच पाजायचे आहे ना!

**गजानन भोईर :-**

हवे असल्यास आम्ही माणसे देतो. प्रत्येकजण दहा दहा माणसे देतील. नाहीतरी, मुले सुट्टीवर आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मागच्या वेळी मी सभेत बोललो की, अशी माणसे घेता येतात आणि आपल्याकडे जर अशी माणसे असतील तर सांगा.

**केशव घरत :-**

साहेब, त्यांनी मागणी करायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहेब, अशी जर माणसे आपल्याला मिळत असतील तर आपण पल्स पोलिओला तशी माणसे पुरवावीत असे आव्हानही केले होते. आपल्या आपल्या प्रभागातील जे कार्यकर्ते असतील ज्यांना आपण मानधनावर तेवढ्या काळापर्यंत द्यावे असे मी आपल्याला आव्हान केले होते.

**केशव घरत :-**

साहेब, आपण बोलता ते बरोबर आहे पण मानधन फार कमी आहे ना!

**अनंत पाटील :-**

अधिकारी आहेत त्यांनी आव्हान करायला पाहिजे, ते आमच्यापर्यंत यायला पाहिजे. सभापती साहेब आपण अधिका-यांना तशी सुचना केली पण त्याची परिपूर्ण अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे.

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहेब, पल्स पोलिओच्या मोहिमे अंतर्गत सफाई कामगार प्रत्येक प्रभागातून त्या कामाला लागल्या कारणाने प्रत्येक वॉर्डात सफाईच्या कामावर त्याचा परिणाम झालेला आहे आणि तसेच, सदस्यांची मागणी आहे आणि तक्रारही आहे की, अशा पद्धतीने काम केल्यामुळे आमच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्याबाबत आपण आपला खुलासा करावा.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण जे पल्स पोलिओकरिता कामगार घेता त्यांना पल्स पोलिओचा पगार वेगळा आणि तुमचा पगार वेगळा असतो का?

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे ठेकेदाराचा पगार आणि आपण देता तो पगार वेगळा आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

ठेकेदाराच्या कामगारांचा पगार वेगळा असतो आणि पल्स पोलिओचा पगार वेगळा असतो का?

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, ठेकेदाराचे जे कामगार आपण पल्स पोलिओ मोहिमेकरिता घेतो त्यांना ठेकेदार त्यांचे जे नियमितपणे आहे तो त्यांचा पगार दिला जातो.आपले फक्त मानधन असते २५ रूपये. जे शासनाने आपले कर्मचारी जरी असले तरी तेच २५ रूपये हे मानधन दिले जाते आणि कुठलेही कर्मचारी असले तरी २५ रूपये हे मानधन शासकीय नियमानुसार जे कर्मचारी पल्स पोलिओसाठी काम करतात, मग ते वॉलेन्टरी असो, महापालिकेचे असो, ठेकेदाराचे असो ते त्यांना २५ रूपये देण्यात येतात.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण जर बाहेरची मुले आणली तर त्यांना ही २५ रूपये मानधन दिले जाणार का?

**डॉ. बावस्कर :-**

एकंदरीत सुरूवातीला असे वाटले होते की, पल्स पोलिओ मोहिम ही वर्षभर चालेल आणि वर्षातून काही वेळेसच चालेल. परंतु या वर्षापासून जवळ जवळ प्रत्येक महिन्याला किंवा दिड ते दोन महिन्याच्या अंतरामध्ये पल्स पोलिओची मोहिम यायला लागली आहे. यासाठी एक्स्ट्रा कामगार सुद्धा आपण घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, असे कामगार वेळेवर मिळाले नाही. जर आपल्या माहितीत काही कामगार असतील तर माहिती द्यावी.

**सुर्यकांत भोईर / केशव घरत :-**

डॉ. साहेब, आमच्या माहितीमध्ये आहे पण २५ रूपयामध्ये काम कोण करणार?

**डॉ. बावस्कर :-**

२५ रूपये नाही, असे जे कामगार आहेत त्यांना आपण १२५ रूपये देण्याची व्यवस्था करू. तशी मी साहेबांकडून मंजूरी घेतो आणि असे कामगार असतील तर आपल्या कामगारांना किंवा ठेकेदाराच्या कामगारांना जो रोज देतो तो रोज देण्याची आपण व्यवस्था करू.

**सुर्यकांत भोईर :-**

ठेकेदारांच्या कामगारांना तुम्ही किती रूपये देता.

**डॉ. बावस्कर :-**

१२५ रूपये.

**सुर्यकांत भोईर :-**

१२५ रूपये नाहीच आहे.

**डॉ. बावस्कर :-**

१२५ रूपये महानगरपालिकेने सॅक्शन केले आहे. तेवढाच पगार आपण ह्या कामगारांना देण्याची व्यवस्था करू आणि असे जे कामगार असतील ते काही काळापुरते राहतील, कायमचे राहणार नाही.

**केशव घरत :-**

तेवढ्या पुरते तरी टेम्परंरी ते करू शकतील.

**मा. सभापती :-**

मागच्या सभेमध्ये पल्स पोलिओचा विषय निघाल्यानंतर आपण असे आव्हान केले होते, मी स्वतःने असे आव्हान केले होते परंतु, आपल्याकडून अशा पद्धतीची माहिती सन्मा. सदस्यांपर्यंत जात नाही आणि ती माहिती न गेल्या कारणाने त्यांनी आपल्याला तशी माणसे पुरवली नाही. मागच्या स्थायी समितीत जेव्हा विषय निघाला होता त्यावेळी असे बोललो होतो की, अशी जी माणसे असतील, सेवाभावी संस्था असतील व त्यांचे जर कार्यकर्ते असतील त्यांना पल्स पोलिओच्या कामाकरिता समाविष्ट करावे म्हणून आपण पुढच्या तारखेला आव्हान करा.

**केशव घरत :-**

त्यांना प्रशिक्षण वगैरे काही द्यावे लागते का?

**डॉ. बावस्कर :-**

प्रशिक्षण एका तासामध्ये आम्ही त्यांना देण्याची व्यवस्था करू.

**प्रभात पाटील :-**

डॉक्टर साहेब, आपण शिक्षकांना पल्स पोलिओची ऑर्डर दिली पण त्यावेळी मुलांच्या परिक्षेचा कालावधी हे सर्व आपण बघितले पाहिजे.

**गजानन भोईर :-**

डॉक्टर साहेब, आपल्याला या मोहिमेकरिता प्रत्येक सदस्य कामगार पुरवतील. कारण आज विषय कसा आला तर कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेचे पदाधिकारी अधिकारी वर्ग येथे आले आहेत आणि जागेवर जर सफाई कामगार नसतील तर ते पाहणी काय करणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

बी. पी. रोडला गटाराचे पाणी पुर्ण मेन रोडवर आले आहे.

**केशव घरत :-**

साहेब, अगोदर दोन-दोन, चार-चार कामगार वापरायचे आणि आता प्रभागातील संपूर्ण कामगार नेतात हा काय प्रकार आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

जर ६५ कामगारांपैकी ४० कामगारांना ड्युटी लावली तर किती कामगार राहिले? आणि ते काय काम करतील?

**सुर्यकांत भोईर :-**

आपण पल्स पोलिओच्या मोहिमेकरिता सफाई कामगार घेण्यापेक्षा बाहेरून कामगार मागवा जेणेकरून सफाईचे कामगार जागेवर राहतील आणि शहरात साफसफाई ही होत राहिल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण फक्त आम्हाला आठ दिवस अगोदर पत्र द्या की, पल्स पोलिओची मोहिम आहे त्याकरिता मुले पाहिजेत.

**डॉ. बावस्कर :-**

पुढच्या मोहिमेसाठी मी आपल्याला एक-दोन दिवसात पत्र देतो कारण १५ मे, ही पुढच्या पल्स पोलिओ मोहिमेची तारीख आहे.

**केशव घरत :-**

आपण त्यांना मोबदला १२५ रूपये देणार ना!

**मा. सभापती :-**

१५ मे, २००५ पुढच्या पल्स पोलिओची तारीख आहे आणि त्या दिवसाकरिता आपल्याकडे जे सन्मा. सदस्य आहेत व जे सेवाभावी कार्यकर्ते, संस्था असतील त्यांचे कार्यकर्ते त्यांची नावे प्रशासनाकडे द्यावीत आणि जेणेकरून आपल्याला आपल्या प्रभागामधील जो काही सफाई कामगार वर्ग आहे तो तेथून निघणार नाही आणि व्यवस्थित सफाई होईल आणि सन्मा. सदस्यांना सेवाभावी काम करण्याची संधी मिळेल म्हणून आपण तशी नावे द्यावीत.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब मला अभिनंदन करायचे आहे. कालच्या पुकार वृत्तपत्रात आमची छान पैकी बातमी दिली आहे. ज्या गोष्टी आम्हालाही माहित नव्हत्या, त्या गोष्टी प्रशासनाने की शासनाने त्यात शासन ही असू शकेल की, आम्ही त्या ठेकेदाराकडून पैसे मागितले, मिरा भाईंदरच्या प्रभाग क्र. ७ आणि २४ मध्ये मला असे वाटते त्या ठेकेदाराचे पत्र मी स्वतः वाचले आहे आणि त्यात त्याने कुठेही व्यक्तीच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. पण तरीसुद्धा प्रभाग क्र. ७ आणि २४ च्या सगळया नगरसेवकांची नावे आली आहेत. तसेच, १४ ठेके होते आणि १४ ठेक्यांमध्ये संपूर्ण शहराची पाहणी झाली का नाही मधल्या त्या उपोषणाच्या कालावधीमध्ये ते मला माहित नाही आणि श्री. शेख व श्री. पानपट्टे (उपायुक्त सा़ो) होते. शुटींग झाली, तिथल्या लोकांचे अभिप्राय घेतले व त्यातील १३ ठेके क्लिअर झाले. संपूर्ण शहराचा आणि प्रभाग क्र. ७ नंबरचा पोरशन असा दाखवला गेला त्यामुळे मी मागणी करते की आपण आम्हाला ती व्हिडीओ कॅसेट, लोकांचे अभिप्राय बघायला मिळावे, ठेकेदाराचे पत्रही देण्यात यावे आणि प्रभाग क्र. ७ आणि २४ मध्ये त्या ठेकेदारावर कार्यवाही व्हावी असा ठराव मी आणि सन्मा. सदस्य गजानन भोईर असे दोघांनी मांडला होता आणि ते विरोधी पक्षात असताना सुद्धा त्याच्यावर कार्यवाही झाली नाही. परंतु नंतर सगळा गोलमाल काय झाला हे मला माहित नाही आणि संबंधित स्थायी समितीच्या सदस्यांचा ठराव एका बाजुला गेला आणि कोणीतरी तिसऱ्याने तिथे काय केले माहिती नाही. त्याचा ठराव रद्द करण्याइथपर्यंत प्रशासन आलेले आहे, त्याला तसे पत्र गेलेले आहे की त्याच्यावर कार्यवाही होणार म्हणून. स्थायी समितीच्या सदस्यांना डावलून त्यांचा तुम्ही अपमान केला आम्ही ठराव मांडलेला असताना आणि तिसऱ्याच कोणाच्या तरी अनुषंगाने आणि त्यांच्या कार्यवाहीने त्याच्यावर कारवाई होणार म्हणजे येथे मोठ कोण? स्थानिक नगरसेवकांना तुम्ही व्हॅलीड करता की, आणखीन तिसराच कोणीतरी मागतो त्याला तुम्ही व्हॅलीड करता. मला ह्याचे उत्तर पाहिजे आणि पुरावे पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला ह्यांचे पुरावे पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

आम्ही श्री. शेख साहेबांचे पुरावे वाचलेले आहेत आणि ते संपूर्ण क्लिअर आहेत.

**गजानन भोईर :-**

ही माहिती त्या पेपरवाल्याला कोणी दिली ह्याचा ही आम्हाला खुलासा पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभाग क्र. ७ आणि २४ ची जी व्हिडीओ शुटींग काढली आहे ते आपण आम्हाला दाखवायची सोय करा, त्यात लोकांचे काय अभिप्राय आहेत. साफसफाई होते की नाही तेही आम्हाला बघायचे आहे.

**प्रभात पाटील :-**

साहेब, आम्ही सुद्धा त्या विषयी माहिती घेतली, अधिकाऱ्यांनी काय माहिती मागितली, लोकांनी काय माहिती दिली. आम्हांलादेखील त्याविषयी माहिती आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील, सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील, गजानन भोईर ह्यांनी प्रभाग क्र. ७ आणि २४ विषयी जी चर्चा केली आणि साप्ताहिक पुकार या पेपरला जी बातमी आली आहे त्याबाबत आपण येथे विचारणा केलेली आहे. आपण केलेल्या या प्रश्नांचा खुलासा देणेबाबत याकरिता एक बैठक आयोजित करून त्यावर ताबडतोब खुलासा मागवून घेवू असे मी याठिकाणी सुचित करत आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण संबंधित पत्रकारालाही बोलवा, डॉक्टरांना बोलवा कारण ही माहिती बाहेर कोणी काढली?

**प्रेमनाथ पाटील :-**

पत्रकार, डॉक्टर आणि ठेकेदार ह्यांना बोलवा.

**मा. सभापती :-**

पत्रकाराला आपण बोलावू शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

कारण त्याच्या पत्रामध्ये कोणाही नगरसेवकाचे नाव नाही. ते पत्र मी स्वतः वाचले आहे आणि ही बातमी कोणी फोडली?

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, महत्त्वाची गोष्ट अशी की, संत गाडगेबाबा स्वच्छता मोहिमे अंर्तगत जो अहवाल आपल्या अध्यक्षतेखाली आपल्या पुढे सादर केला होता. तो अहवाल सापडला नाही म्हणून मी उपोषणाला बसली हे सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना माहित आहे. त्यानंतर कमिशनर साहेबांनी स्वतः मला सांगितले होते की, मी तुमच्याबरोबर येतो, तुम्ही मला दाखवा. त्या अंर्तगत ते आमच्याबरोबर आले आणि त्याची व्हिडीओ शुटींग केली आहे की नाही केली आहे, फोटो काढले आहे की नाही, ते मला माहित नाही. पण माझ्याकडे व्हिडीओ शुटींग आणि फोटोची कॉपी आहे ते मी त्यांना ही दाखवले आहे आणि तुम्हालाही दाखवायला तयार आहे आणि जेव्हा तुम्ही पुढची सभा लावणार त्यावेळी ते मी येथे आणायला ही तयार आहे. राहिली गोष्ट, पुकार साप्ताहिकेत जी न्यूज आली आहे आणि स्थायी समितीचे सदस्य जे प्रभाग क्र. ७ आणि २४ चे सदस्य आहेत त्यांनी ठेकेदाराकडे पैसे मागितले असे जे स्टेटमेंट आलेले आहे. त्याच्यावरून आपल्याला समजून येते की, हा ठेकेदार कुठंपर्यंत जावू शकतो. मी असे बोलत नाही प्रभाग क्र. ७ आणि २४ मध्ये घाण आहे आणि बाकी जागेवर घाण नाही. माझे इन्टेशन तेवढेच होते की, हा जो प्रकार चालला आहे आणि आपला अहवाल काय सांगतो, आपण बोलतो काय? ०७/१२/२००४ च्या सभेत डेंग्यूचा प्रकार प्रभाग क्र. ७ मध्ये मिळाला. त्यानंतर १४/१२/२००४ च्या सभेत आपण विषय आणला, अहवाल आणला.

**मा. सभापती :-**

आपण ह्या विषयाकरिता बैठक लवकरच घेणार आहोत त्यात चर्चा करू या.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०१ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ०१ या विषयावर झालेली चर्चा इतिवृत्तांतात घेऊ नये आणि सदरचा हा विषय पुढच्या सभेत घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. ०३/०३/२००५ रोजीच्या मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०२ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आमचा या ठरावाला विरोध नाही. पण आपल्याला येथे जे ५३८ कर्मचारी गेले सन १९९०-९३ पासून काम करत आहे असे ५३८ पैकी २१ जण मयत झाले आहेत आणि दोन कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत. मग आपण ह्या कर्मचाऱ्यांचा का विचार करू नये. हा जो विषय आणला यात ५३८ मध्ये सुद्धा असे बरेचसे २५-२६ कामगार आहेत. त्यांच्यासाठी आपण का करू नये.

**मा. सभापती :-**

५३८ कामगारांना जेव्हा आपण कामावर रूजू केले त्यावेळी आपण शासनाकडे अशी अट ठेवली आणि शासनाला सांगितले की, ह्यांना कोणत्याही प्रकारच्या सवलती आपण देणार नाहीत आणि ह्या अटीवर ५३८ कामगार आपण रूजू केले. त्यांच्यानंतर पुन्हा ठराव करून शासनाला आपण पत्र पाठवले आहे की, जे इतर कामगार आहेत त्याप्रमाणे ५३८ कामगारांना न्याय मिळावा, त्यांनाही तशा सवलती द्याव्यात असे पत्र आपण शासनाला पाठवले आहे आणि ते शासनाच्या मंजुरीकरिता अधिन आहे आणि त्याची मंजुरी आल्यानंतर आपण त्यांना ही तशी सवलती देवू.

**प्रभात पाटील/ प्रेमनाथ पाटील :-**

आपण आम्हाला त्या पत्राची कॉपी द्यावी.

**मा. सभापती :-**

पत्राची कॉपी देण्यात यावी.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, मागच्यावेळी आठ ते दहा दिवस स्वातंत्र सैनिकांच्या वारसांनी काम केले होते असे जवळजवळ ३५-४० कामगार आहेत. ते कामगार कामावर आठ-दहा दिवस रूजु असताना त्यांना कामावरून काढले त्यांचा आपल्याकडे परत कधी विषय आला नाही. ते लोकसत्ता पेपरला आले, सभेमध्ये आले तेव्हा प्रत्येक नगरसेवकांनी त्याला दुजोरा दिला. पण असे विषय आपण परत का आणत नाही? आज त्याला दिड ते तीन वर्ष झाली आहेत. आपण स्वातंत्र्य सैनिकांबद्दल फक्त आपण बोलतो, त्यांचे बोर्ड लावा हे करा आणि ते करा. पण त्यांच्या वारसांना ज्या नोकऱ्या पाहिजे तो विषय कुठे गेला? मागच्या वेळेस आपण तीन वेळा असेच सांगितले होते, विषय घ्या. तुम्ही देखील सांगितले पुढच्या वेळेस घेवू पण आज सात सभा झाल्या.

**प्रभात पाटील :-**

शासनाने परिपत्रक काढले आहे, शासनाचा त्याबाबतचा जी.आर. ही आहे.

**मा. सभापती :-**

शासनाने जरी जी. आर. दिला असेल तरी आपण असलेल्या स्ट्रेंन्थवर भरती करतो, जी असलेली २१ स्ट्रेंन्थ आहे त्याच्यावर आपण भरती करतो. आपण ह्याचा फेर आढावा घेवू या आणि आस्थापनाला निर्देश देवून तशा प्रकारचा विषय घेवू या.

**हॅरल बोर्जीस :-**

नियमाप्रमाणे जे बसत असेल त्याचा आगामी सभेपुढे विचार करण्यात यावा.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, अशा संदर्भामध्ये प्रशासकीय काळामध्ये आपल्याकडे संगणक विषयाचा प्रस्ताव पडून आहे.

**मा. सभापती :-**

संगणकाचा जो विषय आहे आणि जे इतर पदाची मागणी आपण केलेली आहे त्या विषयावर मी स्वतः मा. ना. बा. पाटील ह्यांना भेट दिली आहे आणि त्यांना प्रस्ताव ही दिलेला आहे आणि तो प्रस्ताव मुख्यमंत्री साहेबांकडे गेलेला आहे आणि त्यांच्याकडून तो प्रस्ताव पुन्हा नामंजुर होवून आलेला आहे आणि आपण पुन्हा तो प्रस्ताव पाठवलेला आहे आणि त्याचा फॉलोअप चालू आहे आणि त्याचा फॉलोअप पुढे चालू ठेवून ते काम लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न मी करत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ०२ वारसा अनुकंपा पद्धतीने महापालिका सेवेत घेणेबाबत, सन्मा. आयुक्त साहेबांनी मा. स्थायी समितीला शिफारस केल्याप्रमाणे वरील गोषवाऱ्यामध्ये आपल्याला सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे तरी आजची ही स्थायी समितीची सभा वरील कर्मचाऱ्यांना सेवेत नेमणूका देणेबाबत मा. स्थायी समिती सभा ह्या ठरावाला मंजुरी देत आहे आणि मा. महासभेला शिफारस करावा असा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, ह्याच्यामध्ये आणखीन काही प्रकरणे वारसा हक्काविषयी किंवा अनुकंपाबाबत जर अजूनही काही प्रकरण पेन्डींग असतील तर मा. महासभेला शिफारस करताना त्यांचासुद्धा उल्लेख करण्यात यावा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रभात पाटील व सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी जी ठरावात दुरूस्तीची सुचना मांडली त्या दुरूस्तीसह हा ठराव आपण मंजूर करित आहोत.

**गजानन भोईर :-**

५३८ कामगारांविषयी जे मी सुचना मांडलेली आहे ती ही त्याच्यात समाविष्ट करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्यांनी ज्या दुरूस्तीची सुचना दिली आहे त्या दुरूस्तीसह हा ठराव मा. महासभेला शिफारस करावा असा ठराव मी मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ०२ :-**

वारसा / अनुकंपा पद्धतीने महानगरपालिका सेवेत घेणेबाबत.

**ठराव क्र. ०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मयत कर्मचारी श्री. लुद्रस्वामी ज्ञानप्रकाश हे महानगरपालिका आस्थापनेवर सफाई कामगार म्हणून दि. १५/७/१९९१ पासून कार्यरत होते. त्यांचे दि. ३०/४/२००४ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पत्नी श्रीम.सुशमरी लुद्रस्वामी यांनी वारसा पध्दतीने त्यांचा मुलगा श्री. अंथोनी प्रभु लुद्रस्वामी यांस महानगरपालिका सेवेत घेण्याची विनंती केली आहे. तसेच श्री. सुरजित हुशारा हे सफाई कामगार म्हणून दि. १४/३/१९८५ पासून महानगरपालिका सेवेत होते. ते दि. ३०/९/२००४ रोजी सेवा निवृत्त झाले आहेत. त्यानी त्यांचा मुलगा श्री.अशोक सुरजित हुशारा यांना महानगरपालिका सेवेत घेण्याची विनंती केली आहे. श्रीम. दिवाळी नाथा पुरविया, या महानगरपालिका आस्थापनेवर कायम सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. सद्यःस्थिती मध्ये त्या संधीवात हया गंभीर विकाराने आजारी असून सिव्हिल सर्जन ठाणे यांच्या प्रमाणपत्रानुसार त्या वरील विकारामुळे कोणत्याही प्रकारचे काम करण्यास अपात्र आहेत असे निर्देशित केलेले आहे. श्रीम. दिवाळी नाथा पुरविया यांनी दि. २३/२/२००४ नुसार विनंती अर्ज देवून रुग्णता सेवानिवृत्ती देण्यांत यावी व मुलगा श्री. दिनेश नाथा पुरविया यास महानगरपालिका सेवेत घेण्यांत यावे अशी विनंती केली आहे. श्री.गोपाळ बच्चु सोलंकी हे महानगरपालिका सेवेत वाहन चालक या पदावर कार्यरत होते. दुदैवाने त्यांचे दि. २६/१/२००४ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पत्नी श्रीम.कांता गोपाळ सोलंकी यांनी वारसा / अनुकंप पध्दतीने महानगरपालिका सेवेत घेणेबाबत विनंती केली आहे. श्री.पंढरीनाथ वैती हे महानगरपालिका आस्थापनेवर दि.१/४/१९९१ पासून दवंडी बोअरवेल म्हणून कार्यरत होते. ते दिनांक ३१/१/२००४ रोजी नियत वयोमानुसार सेवा निवृत्त झाले आहेत. त्यांनी वारसा / अनुकंपा पध्दतीने त्यांचा मुलगा श्री. हरिषकुमार पंढरीनाथ वैती यास महानगरपालिका सेवेत घेण्यास अशी विनंती केली आहे.

शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २२९२/१९९९/प्र.क्र.१६४/९२, नवि-६, दि.५/११/१९९२ नुसार वारसा पध्दत हि प्रामुख्याने घाण काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू असून त्यांची आर्थिक परिस्थिती सुध्दा सबळ नसते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना नोकरीची व राहण्याची शाश्वती मिळणे अत्यंत आवश्यक आहे. असे कर्मचारी सेवा निवृत्त किंवा गंभीर आजारामुळे शारीरिक दृष्टया अपंग किंवा विकलांग झाल्यास किंवा सेवेत असतांना दिवंगत झाल्यास वारस पध्दतीचा अवंलब करुन त्यांनी नामनिर्देशित केलेल्या वारसास किंवा जवळच्या नातेवाईकास सेवेत घेता येईल. वरील कर्मचाऱ्याबाबत या पध्दतीचा अवलंब करुन यांचे वारस अनुक्रमे १) श्री. अंथोनी प्रभु लुद्रस्वामी २) श्री.अशोक सुरजित हुशारा, ३) श्री.दिनेश नाथा पुरविया यांना वारसा पध्दतीने सफाई कामगार म्हणून रु. २५५०-३२०० या वेतनश्रेणीत महानगरपालिका सेवेत नियुक्ती देता येते.

तसेच शासन निर्णय क्र. २२२००२/५१०/प्र.क्र.५३/२००२/नवि-६, दिनांक १७/८/२००२ नुसार सेवा निवृत्त चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या वारसदाराची नियुक्ती करणे व अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करणे किंवा सफाई कामगाराची नियुक्ती करणे इत्यादी बाबी संदर्भात या शासन निर्णयानुसार नियुक्त्या करण्यास महानगरपालिका सक्षम आहे. या शासन निर्णयाचा अवलंब करुन अनुक्रमे १) मयत श्री. गोपाळ बच्चु सोलंकी यांची पत्नी श्रीम. कांता गोपाळ सोलंकी यांना सफाई कामगार या पदावर व २) श्री.पंढरीनाथ वैती, दंवडी बोअरवेल, (सेवानिवृत्त) कर्मचारी यांचा मुलगा श्री.हरिषकुमार पंढरीनाथ वैती, यांना सफाई कामगार या पदांवर रु. २५५०-३२०० या वेतनश्रेणीत वारसा / अनुकंपा पध्दतीने महानगरपालिका सेवेत नियुक्ती देता येते.

तरी सुशमरी लुद्रस्वामी यांचे जागी १) श्री. अथोनी प्रभु लुद्रस्वामी (मुलगा) २) श्री. सुरजित हुशारा यांचे जागी श्री. अशोक सुरजीत हुशारा (मुलगा) व श्री. दिवाळी नाथा पुरविया यांचे जागी श्री. दिनेश नाथा पूरविया यास, वारसाने महानगरपालिका सेवेत सफाई कामगार म्हणून रु.२५५०-५५-२६००-३२०० या वेतनश्रेणीवर नियुक्ती देण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच वारसाने / अनुकंपा पद्धतीने गोपाळ बच्चु सोलंकी (मयत) यांचे जागी श्रीम. कांता गोपाळ सोलंकी (पत्नी) श्री. पंढरीनाथ वैती यांचे जागी श्री. हरिष कुमार पंढरीनाथ वैती, मुलगा यांना महानगरपालिका सेवेत सफाई कामगार म्हणून रु. २५५०-५५-२६००-६०-३२०० या वेतनश्रेणीवर नियुक्ती देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०३ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी मागच्या सभेला ह्यांनी सांगितले होते की, सदरचा विषय आपण पुढच्या सभेला घ्यावा त्यामुळे आपण हा विषय पुढच्या सभेला आणलेला आहे. आपल्या शहरातील क्रिडा रसिकांचा क्रिडेचा दर्जा सुधारावा या दृष्टीकोनातून आपण विषय आणला होता आणि त्या विषयावर साधक बाधक चर्चा व्हावी त्या दृष्टीकोनातून आपल्या शहरातील जे क्रिडा प्रेमी आहे आणि जे खेळाडू आहेत त्यांना सुद्धा आपणाकडून संधी देण्यात यावी. अशापद्धतीने आपण हा विषय घेतला होता. आस्थापनावर क्रिडा अधिकारी हे पद मंजुर आहे ते पद आपल्याकडे अधिकृतरित्या येईपर्यंत आपण अशापद्धतीचा एखादा अधिकारी नेमावा असा विषय आपण ह्या सभागृहासमोर आणलेला आहे त्याविषयी कृपया आपण विचार करावा असे मी सर्व स्थायी सदस्यांना विनंती करतो.

**प्रभात पाटील :-**

ह्या विषयाला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही, कारण एकंदर शहराच्या शारिरिक दृष्टीने हा विषय आवश्यक आहे. परंतु, त्याबाबतचा आम्हाला गोषवारा दिलेला नाही. ह्या ठरावा नुसार जर फक्त पदाला मंजुरी द्यायची असेल तर ह्या पदनिर्मितीला आमची मंजुरी आहे. परंतु, कोण असा नॉमिनेशन येथे नसल्यामुळे आम्ही फक्त प्रस्तावाला संमती देत आहोत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सभापती साहेब, हा विषय आपण मा. महासभेत घ्यावा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्सजी, ह्याला संपूर्ण स्थायी समितीचा अधिकार आहे. त्यामुळे आपला अधिकार असताना आपण हे मा. महासभेसमोर कशाला घेवून जायला हवे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण सर्व वृत्तपत्रामध्ये नोटीस द्यावी.

**प्रभात पाटील :-**

सर्व वृत्तपत्रामध्ये नोटीस देण्यात यावी. कायदेशीररित्या कामकाज करावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पेपरात जाहिर नोटीस देवून नॉमिनेशन मागवावे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

टाईम्स ऑफ इंडियापासून सर्व राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात द्यावी.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ०३ ठेका पद्धतीने विशेष कार्यकारी अधिकारी (क्रिडा) मानधनावर नेमणेबाबत. आजच्या स्थायी समितीवर जो विषय आहे मी आजच्या स्थायी समितीसमोर असा ठराव मांडत आहे की, ठेका पद्धतीने विशेष कार्यकारी अधिकारी (क्रिडा) मानधनावर घेण्याबाबत. प्रशासनाने ह्या बाबतीमध्ये जे काही नियमाप्रमाणे कार्यवाही आहे ती करून जाहिरपणे त्याची वृत्तपत्रामध्ये नोटीस प्रसिद्ध करून ज्या त्यांच्या विहित दिवसामध्ये, नमुन्यामध्ये ज्या काही त्यांच्या गोष्टी असेल ते करून हे ठेकापद्धतीचे क्रिडा अधिकारी पद भरण्यासाठी आजची ही स्थायी समितीची सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रभात पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे जे कर्मचारी वर्ग आहे, महापौर चषक गेले दोन वर्ष ते महापौर चषक पटकावितात. ह्या कर्मचाऱ्यांमध्ये असे एकही कर्मचारी नसेल की, जो आपल्या ह्या पदावर काम करेल.

**प्रकरण क्र. ०३ :-**

ठेका पद्धतीने विशेष कार्यकारी अधिकारी (क्रिडा) मानधनावर नेमणेबाबत. (दि. ३०/०३/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १७४)

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत विशेष कार्यकारी अधिकारी (क्रिडा) मानधावर नेमणेबाबत विषय आलेला आहे. याबाबत प्रशासनाने विशेष कार्यकारी अधिकारी (क्रिडा) नेमणयाबाबत आवश्यक असलेल्या अटीशर्ती, पात्रता, वयोमर्यादा आदी बाबींची विहित नमुन्यात माहिती घेऊन व त्याची जाहिरपणे वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन ठेका पद्धतीने विशेष कार्यकारी अधिकारी (क्रिडा) हे पद भरणेबाबत प्रशासनाने पुढील कार्यवाही करणेसाठी ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्रीम. प्रभात पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सचिवजी प्रकरण क्र. ०१ वर जी चर्चा झालेली आहे, ती चर्चा इतिवृत्तांत घ्यायची नाही असे मी रूलिंग दिलेले आहे आणि सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांचे आभार मानून आजची ही सभा संपल्याचे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सकाळी ११.५५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**